ISSN 2349-1027

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year -X, Issue - XX, Vol. - II | Impact Factor 6.50 (GRIFI) | Feb. 2024 To July 2024

भारतीय दार्शनिक अनुसंधान परिषद (ICPR) दिल्ली द्वारा प्रायोजित

आणि

शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय

शिवळे तत्त्वज्ञान विभाग द्वारा आयोजित

दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र

दिनांक ०१ ते ०२ मार्च २०२४

## महात्मा फुले आणि समकालीन विचारवंताचे तत्त्वज्ञानातील योगदान



संपादक

डॉ. गीता विशे (प्रभारी प्राचार्य)

डॉ. सुनिलदत्त गवरे (तत्त्वज्ञान विभाग प्रमुख)

IAP
Issue - XX, Vol.- II
IWR
IMPACT FACTOR
6.50
ISSN 2349-1027
Feb. 2024 To July 2024

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Maharshi Dayanand Saraswati's Views on Râja Dharma<br>**Dr. Kokila Kalekar** | 1 |
| 2 | डॉ. अम्बेडकर का जाति-अर्थशास्त्र विषयक एक आलोचनात्मक चिंतन<br>**डॉ. अमन बगाडे** | 8 |
| 3 | स्वामी विवेकानंद : शिक्षणआणिग्रंथालय विषयक दृष्टिकोन<br>**डॉ. दिलीप गोविंदा पाटील** | 14 |
| 4 | बाबा आमटे यांची आनंदवनाची संकल्पना<br>**डॉ. वेदप्रकाश डोणगावकर** | 19 |
| 5 | संत गाडगे महाराजांचे सामाजिक तत्त्वज्ञान<br>**डॉ. प्रभाकर रामलिंग किर्तनकार** | 25 |
| 6 | "नैतिकता हा बौध्द धम्माचा सार होय" डॉ. भिमराव आंबेडकर<br>**रंजना मलकप्पा प्रसन्ना** | 28 |
| 7 | सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक तत्वज्ञान<br>**डॉ. विजय सोपानराव शेडगे** | 33 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्वज्ञान आणि ग्रंथालय विषयक दृष्टिकोन<br>**डॉ. दिलीप गोविंदा पाटील, रामकिसन आश्रू मोरे** | 38 |
| 9 | एम. एन. रॉय - तत्वचिंतक ते क्रांतिकारक<br>**डॉ. स्वाती बापूराव भोंगळे** | 42 |
| 10 | अहिंसक सविनय कायदेभंगाचे समर्थन : महात्मा गांधीजी व मार्टिन ल्यूथर किंग<br>**डॉ. संतोष गायकवाड** | 45 |
| 11 | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले<br>**डॉ. अनिल बळीराम बांगर** | 48 |
| 12 | अरविंद घोष यांचे शैक्षणिक विचार<br>**डॉ. धनराज सुभाष हाडुळे** | 54 |
| 13 | महात्मा गांधीचे जीवन विषयक तत्वज्ञान<br>**डॉ. अनिल नारायण पाटील** | 57 |

**Indo Western Researchers (IWR)**

IMPACT FACTOR 6.50

ISSN 2348-

Indo Western Researchers

Issue : XX

Feb. 2024 to July

www.irasg.org



# स्वामी विवेकानंद : शिक्षणआणिग्रंथालय विषयक दृष्टिकोन

**डॉ. दिलीप गोविंदा पाटील**

ग्रंथपाल,

को.ए.सो. लक्ष्मि-शालिनी महिला महाविद्यालय,

पेझारी, ता-अलिबाग, जिल्हा-रायगड.

"संपूर्ण जग हातात तलवारी घेऊन तुमच्याविरुद्ध उभे ठाकले, तरी ध्येयपूर्तीसाठी पुढे जाण्याची धमक तुमच्यामधे असायला हवी"

\- स्वामी विवेकानंद

**सारांश:**

*"प्रस्तुत लेखामध्ये स्वामी विवेकानंद यांचा अल्प परिचय दिलेला असून त्यांचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट केलेले आहेत. शिक्षण हे समाजपरिवर्तनाच एक प्रभावी साधनं आहे. त्यांच्या मते शिक्षणाचा उद्देश 'माणूस' निर्माण करणे हाच असला पाहिजे. शिक्षणामुळे मानवाच्या मानसिक शक्ती मध्ये वाढ होते. बुद्धीचा चौफेर विकास होतो आणि त्यामुळे तो स्वत:च्या पायावर उभा राहतो. अशाच प्रकारचे शिक्षण स्वामी विवेकानंदाना अभिप्रेत होते तसेच आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपल्यातले कौशल्य वाढविण्यासाठी भरपूर प्रमाणात वाचन केले पाहिजे व त्यासाठी उपलब्ध होईल त्या ग्रंथालयाचा उपयोग केला पाहिजे याबाबतचे विचार प्रस्तुत लेखामध्ये स्पष्ट केलेले आहेत."*

**प्रस्तावना :**

स्वामी विवेकानंदाचा जन्म ज्या काळात झाला तो काळ पारतंत्र्याचा काळ होता. विशेषता: १९ व्या शतकाचा उत्तरार्ध म्हणजे परस्पर विरोधी विचारांच्या संघर्षाचा कालखंड होता. एका बाजूला परंपरावादी पिढी तर दुसऱ्या बाजूला पाश्चात्यांच्या आचाराने - विचाराने भारावून गेलेली पिढी होती. म्हणजेच भारतीय आणि पाश्चात्य संस्कृतीच्या संघर्षाचा तो काळ होता. अशा काळात भारतीय व्यक्ती स्वत्व आणि स्वदेश प्रेमाला पारखा होत चालला होता. अश्या वेळी भारतीय पुरुषांच्या मनामध्ये शिक्षणाद्वारा स्वसंस्कृतीच्या स्वत्वाची व स्वदेश प्रेमाची ज्योत प्रज्वलित करण्याचे काम स्वामी विवेकानंदांनी केले आणि प्राचीन आध्यात्मिकता व आधुनिक वैज्ञानिक दृष्टीकोनाची सांगड घालून शिक्षणाची राष्ट्रीय दृष्टीकोनातून पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला आणि भारतीय मनोभूमीत राष्ट्रप्रेमाचे बीज पेरून स्वातंत्र्याच्या दिशेने वाटचाल सुरु केली. त्यासाठी शिक्षणाची पताका हाती घेवून लोकाना केवळ 'साक्षर' करण्यापेक्षा त्यां

शिक्षणाच्या माध्यमातून 'जाणते' बनण्याकडे अधिक लक्ष दिले. याच काळात भारतात सार्वजनिक ग्रंथालय सुरु करण्याकडे विविध संस्थांनी व समाजसेवक आणि शिक्षण तज्जांनी लक्ष दिले आणि या माध्यमातून वाचन संस्कृतीला बळकट करण्याचे प्रयत्न झाले.

**स्वामी विवेकानंदाचे चरित्र, बालपण आणि शिक्षण :**

**चरित्र :**

स्वामी विवेकानंदाचे मूळ घराणे बंगालचे होते. सारस्वत समाजातील एक प्रसिद्ध घराणे म्हणून ते ओळखले जाई. विवेकानंदाच्या पणजोबा चे नांव राम मोहन दत्त होते तर आजोबाजे नांव दुर्गाचरण दत्त होते. राममोहन दत्त प्रसिद्ध वकील तर दुर्गाचरण दत्त हे परमार्थ वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनी २५ व्या वर्षीच संन्यास पत्करला.

विवेकानंदाच्या वडिलाचे नांव - विश्वनाथ दत्त तर आईचे नांव - भुवनेश्वरी होते. विवेकानंदाचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला. त्यांचे पूर्वीचे नांव- नरेंद्र विश्वनाथ दत्त होते. नंतर त्यांना स्वामी विवेकानंद या नावाने ओळखले जावू लागले.

**बालपण :**

नरेंद्र हा अत्यंत हूड वृत्तीचा होता. तसेच त्याच्यावर आईच्या धार्मिक संस्काराचा प्रभाव होता. नरेंद्रचे वडील वकील असल्यामुळे सर्व जाती-जमातीचे व धर्माचे लोक त्यांच्याकडे येत-जात असत. त्यामुळे सर्व जाती-जमातीची माणसे म्हणून सगळी सारखीच ही समतेवरील नरेंद्रची निष्ठा दृढ होत गेली आणि पुढे पुढे एकाग्रतेने चिंतन करण्याची शक्तीही वाढत गेली. किशोरावस्थेपासूनच तो व्यायाम, खेळ आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेई. त्यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, मुष्टियुद्ध, पोहणे,होडी वल्हवणे, घोडेस्वारी, लाठियुद्ध, गायन आणि वादन इत्यादी छंद होते.

**शिक्षण :**

नरेंद्रनाथांनी आपल्या घरीच शिक्षणाची सुरुवात केली. नंतर त्यांनी १८७१ साली ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्यूशनमध्ये प्रवेश घेतला आणि ते १८७९ मध्ये प्रेसिडेन्सी कॉलेजची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले. काही दिवस या संस्थेत राहिल्यानंतर पुढे त्यांनी जनरल असेम्ब्लीज इन्स्टिट्यूशनमध्ये प्रवेश घेतला. येथे त्यांनी तर्कशास्त्र, पाश्चात्त्य तत्वज्ञान, आणि युरोपचा इतिहास यांचा अभ्यास केला. १८८१ साली ते फाइन आर्टची आणि १८८४ मध्ये बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. शालेय अभ्यासक्रमापेक्षा शाळेतर कार्यक्रमातच नरेंद्र अधिक रस घेत असे. उच्च शिक्षण घेत असतांना हर्बार्ट स्पेन्सर व जान स्तुअर्ट मिल यांच्या तत्वज्ञानाचा नरेंद्रवर फार प्रभाव पडला. याशिवाय वर्ड स्वर्थ व शैले या कवीच्या कवितांचाही त्यांच्या मनावर विशेष छाप पडली. विशेषतः नरेंद्राची तत्वज्ञान या विषयाची प्रगती पाहून त्यावेळी प्रेसिडेन्सी कॉलेजचे प्राध्यापक हेस्टी यांनी 'एक तत्वज्ञ विद्यार्थी' म्हणून नरेंद्राचा गौरव केला. अश्या त?हेने या वेळी मानवी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनाचे बीजारोपण झाले.

**वाचन :**

नरेंद्र विश्वनाथ दत्त उर्फ स्वामी विवेकानंद यांना वाचनाची आवड होती. त्यांनी भारतीय आणि पाश्च्यात्य ग्रंथाचे वाचन केले आणि वाचनातून अंतिम सत्य जाणून घेण्याची ओढ त्यांच्यामध्ये निर्माण झाली. अंतिम सत्य म्हणजे काय? परमेश्वर आणि अंतिम सत्य एकच आहे का ? परमेश्वर कोणी पहिला आहे का? अश्या प्रश्नाची उत्तरे मिळाल्याशिवाय त्यांच्या मनाचं समाधान होत नव्हत. या जिज्ञासेने ते आणखी अनेक ग्रंथाचे वाचन करीत. अश्या स्तिथीत असतांना नोव्हेंबर १९८१ मध्ये नरेंद्र ने रामकृष्ण यांची भेट घेतली."तुम्ही देव पहिला आहे का?" या त्यांच्या प्रश्नास "होय, मी देव पाहिला आहे" असं सुस्पष्ट उत्तर रामकृष्णांनी दिल. त्यांनी नरेंद्रास ध्यान साधना आणि निर्विकार समाधीतून साक्षात्कार अनुभवण्याचा मार्ग दाखवला.

**रामकृष्णाचा सहवास :**

नरेंद्र रामकृष्णाच्या सहवासात पाच वर्षे होता.

नरेंद्राला पहिल्या वेळी समाधी प्राप्ती झाली. नंतर तो आनंद व्यक्त करण्यासाठी रामकृष्णाना भेटले तेव्हा ते म्हणाले " तुला त्या आनंदात बुडून राहता येणार नाही. तुझ्या हातून या जगात जगन्मातेच काही कार्य व्हायचं आहे." जगन्मातेच त्यात 'लाजीकल इन्वेस्टीगेशन (१९०२), 'आयडिया आफ प्युअर फिनामिनालाजी आणि फिनामिनालाजीकल फिलासाफी (१९१३), व 'कर्तेशिअन मेडीटेशन (१९३१) या महत्वाच्या ग्रंथांचा समावेश होतो.

स्वामी रामकृष्ण परमहंस १९८६ मध्ये निधन पावले.नरेंद्रने सन्यास दीक्षा घेतली. आणि पुढे विवेकानंद या नावाने कार्य केले.कर्मकांड, अंधश्रद्धा , अन्यायजन्य रूढी शुद्ध करून बलशाली राष्ट्र उभारण्याच आवाहन विवेकानंदानी केले.

११ सप्टेंबर, १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो शहरातील शिकागो - आर्ट इन्स्टिट्यूट येथे सर्वधर्मीय परिषद भरली होती. त्या सभेला विवेकानंद गेले. तेथे त्यांनी "अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो" अशी भाषणास सुरुवात केली आणि सभेसाठी जमलेल्या सुमारे सात हजार लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला, जो दोन मिनिटे अखंड चालू होता. "जिने जगाला सहिष्णुता आणि वैश्विकतेचा स्वीकार करण्याची शिकवण दिली आहे, अशा सर्वात प्राचीन असणाऱ्या संन्याशांच्या वैदिक परंपरेच्या वतीने, मी जगातील नवनिर्मित राष्ट्रांचे स्वागत करतो" या शब्दात त्यांनी आपले व्याख्यान पुढे चालू केले.विवेकानंदाना अमेरिकेतील शिकागो येथे विश्व धर्म परिषदेला जाण्याची संधी मिळाली तेव्हा आपल्या मधुर वाणीने सर्व उपस्थितांची माने जिंकली.वैश्विक एकात्मता साधण हाच खरा धर्म आहे असं प्रतिपादन त्यांनी केले.नंतर विवेकानंदाच्या व्याख्यानाचे दहा खंड प्रसिद्ध झाले आहेत.व्यसनमुक्त, शोषणमुक्त, भयमुक्त समाज घडवणे हेच आपल आद्यकर्तव्य आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.स्वामी रामकृष्णाच्या आदेशानुसार सन्यास व्रत स्वीकारून विवेकानंदानी कलकत्यात रामकृष्ण संघाची स्थापना केली. त्यात रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशन अशा दोन प्रमुख शाखा त्यात आध्यात्मिक कार्य तर रुग्णसेवा, शिक्षण ग्रंथप्रकाशन, आपत्कालीन सेवा अशी कामे विवेकानंदाचे शिक्षण आणि ग्रंथालय विषयक 'शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा अविष्कार अशी शिक्षणाची व्याख्या त्यांनी केली. शिक्षण आत्मानुभूती, आत्मज्ञान किंवा आत्मसाक्षात्कार विवेकानंदाची धारणा होती.

**शिक्षण ही एक स्वाभाविक प्रक्रिया आहे :**

मुल पाळण्यापासून ते थळण्यापर्यंत असते. शिकण्याची प्रक्रिया स्वाभाविकपणे असते एखाद्या रोपट्याचा जसा स्वाभाविक विकास असतो तसाच मुलांचाही विकास होत असतो पेस्टलाजी व फोबेल या पाश्चात्य शिक्षणतज्ज्ञांचा विवेकानंदावर होता.

**शिक्षणाचे तत्वज्ञान :**

'सुप्त शक्तीचा पूर्ण अविष्कार म्हणजे होय' या विवेकानंदाच्या विचारातच शिक्षणविषयक ानाचे सार सामावलेले आहे. प्रत्येक माणसामध्ये अंतर्निहित असतेच. सुयोग्य वेळी त्या ज्ञानावर अज्ञानाचे आवरण दूर होते व माणसाला ज्ञान मिळत जाते. माणसाच्या मनात मूळ ज्ञानाची बैठक असते तिचा प्रसंगानुसार अविष्कार होणे विवेकानंद शिक्षणाचा एक भाग समजतात.माणसा अव्यक्त शक्तीची त्यास जाणीव देवून ती व्यक्त येण्याविषयी प्रेरणा देण्यामध्येच विवेकानंदाचे शिक्षण तत्वज्ञानाचे महत्व सामावलेले आहे असे वाटते

**शिक्षणाची पद्धती :**

सर्व शिक्षणाचे खरेखुरे सार म्हणजे एकाग्रता होय. असे विवेकानंदाचे मत होते.एका ज्ञान साधनेची गुरुकिल्ली आहे.मनाची एकाग्रता श्रद्धा ही ज्ञान साधनेची दोन प्रमुख नेत्र आहे विवेकानंद म्हणायचे.

**चारित्र्य संवर्धन :**

चारित्र्य संवर्धनाला शिक्षणामध्ये फार मोठे महत्व आहे. शिक्षण प्रक्रियेमध्ये प्रत्येक विचार, विद्यार्थी मनावर एक संस्कार उमटवीत असतो. अश्या संस्कारामाधुनच त्यांचे चारित्र्य आकार घेत असते.शिक्षणातून वाईट संस्कार कसे टाळता येईल याकडे कटाक्षाने शिक्षणातून लक्ष दिले पाहिजे असे विवेकानंदाचे विचार होते.असे झाले तर आचार, विचार आणि उच्चारामधील पावित्र्य जोपासले जाईल.

**शिक्षक आणि विद्यार्थी :**

शिक्षण पद्धतीतील परस्परावलंबी दोन भाग म्हणजे शिक्षक व विद्यार्थी होय.शाळेत घडून येणारी क्रिया जेवढी प्रभावी असेल तेवढा तो विद्यार्थी सर्वांगीण तयारीचा बनू शकेल.यासाठी विवेकानंद गुरुकुल पद्धतीचा आग्रह करतात.श्रेष्ठ गुरूचा सहवास लाभल्यामुळे आदर्श जीवन कसे जगावे याचा सहजपणे संस्कार घडून येतो.

**स्त्रीशिक्षण :**

स्वामी विवेकानंदाच्या मते, स्त्रियांचे सर्व प्रश्न शिक्षणाने सुटू शकतात.शिक्षणामुळे स्त्रिया स्वावलंबी तर होतीलच शिवाय शीलसंपन्न बनतील.स्त्रियाना दर्जेदार शिक्षण मिळाले तर तर देशाची प्रगती झपाट्याने होईल.

**लोकशिक्षण :**

आपला देश ग्रामप्रधान असल्यामुळे गावागावात शिक्षणाची सुविधा असली पाहिजे यावर यावर विवेकानंदानी भर दिलेला आहे.लोकांना साक्षर बनवून शिक्षणाच्या माध्यमातून 'जाणते' बनविण्याकडे अधिक लक्ष पुरविण्यात यावे असे विवेकानंदानी सांगितले.

**ग्रंथालय :**

आपले जीवन घडविणारे, माणूस निर्माण करणारे चारित्र्य घडविणारे चांगले विचार आत्मसात करणारे शिक्षण हवे. चांगले विचार आत्मसात करून आपल्या जीवनात व आचरणात उतरविले तर अवघे ग्रंथालय मुखोद्गत करणाऱ्या व्यक्तीपेक्षाही तुमचे शिक्षण सरसच ठरेल. शिक्षण आणि माहिति एकच मानली तर ग्रंथालयांना थोर महात्मे आणि ज्ञानकोशानात्र्क्षी म्हणावे लागेल.

**राष्ट्रीय युवा दिवस :**

राष्ट्रीय युवा दिवस ! स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८३३ मध्ये कोलकाता येथे झाला. १२ जानेवारी, स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस राष्ट्रीय युवा दिवस, म्हणून साजरा केला जातो.ज्याला विवेकानंद जयंती देखील म्हणतात.स्वामी विवेकानंद हे अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते. तसेच प्रतिष्ठित, विद्वान, विचारवंत, लेखक होते. त्यांनी इतिहास, तत्त्वज्ञान आणि साहित्य यांच्याविषयी अभ्यास केला. १९८४ मध्ये, भारत सरकारने हा दिवस राष्ट्रीय युवा दिन म्हणून घोषित केला आणि १९८५ पासून हा कार्यक्रम दरवर्षी भारतात साजरा केला जातो.

**स्वामी विवेकानंदाचे प्रेरणा देणारे महत्वपूर्ण संदेश :**

स्वामी विवेकानंद यांनी आपल्या विचारांमुळे स्वतःची एक वेगळी ओळख बनवली. भारत तरूणांचा देश असून या तरूणांना स्वामी विवेकानंद यांचे विचार योग्य दिशा देतील. स्वामी विवेकानंद हे केवळ धार्मिक नेते नाही तर उत्कृष्ट लेखक आणि वक्ते सुद्धा होते. त्यांनी केलेली कामे ही युवकांसाठी प्रेरणा देणारी आहेत.

१. जागृत व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका.
२. प्रत्येक कामाला तीन टप्प्यांतून जावे लागते ते म्हणजे उपहास, निषेध आणि स्वीकार.
३. कशाचीही भीती बाळगू नका. तुम्ही आश्चर्यकारक काम कराल. ही निर्भयता आहे जी एका क्षणात परमआनंद आणते.
४. शिक्षण म्हणजे काय? ज्या संयमाने इच्छाशक्तीचा प्रवाह आणि विकास नियंत्रणात आणला जातो आणि तो फलदायी होतो त्याला शिक्षण म्हणतात.
५. वाईट विचार आणि वाईट कृती तुम्हाला अधोगतीकडे घेऊन जाते हे विसरू नका.

त्याचप्रमाणे लाखो देवदूतांसारखे चांगले कृत्य आणि चांगले विचार अनंतकाळपर्यंत तुमचे रक्षण करेल.

६. लोक तुमची स्तुती करू शकतात किंवा तुमची निंदा करू शकतात. तुमचा आज मृत्यू झाला किंवा भविष्यात, तुम्ही न्यायाच्या मार्गापासून कधीही भरकटू नका.

७. तुला जे वाटतं तेच तू बनशील. जर तुम्ही स्वतःला कमजोर समजत असाल तर तुम्ही कमजोर व्हाल. जर तुम्ही स्वतःला मजबूत समजत असाल तर तुम्ही मजबूत व्हाल.

८. जोपर्यंत जगताय, तोपर्यंत शिका. अनुभव हा जगातील सर्वोत्तम शिक्षक आहे.

९. एक कल्पना आहे. त्या कल्पनेला आपले जीवन बनवा, त्याचा विचार करा, त्याची स्वप्ने पहा, ती कल्पना जगा. तुमचा मेंदू, स्नायू, नसा, तुमच्या शरीराचा प्रत्येक अवयव त्या विचारात बुडून टाका आणि बाकीचे सर्व विचार बाजूला ठेवा, हाच यशस्वी होण्याचा मार्ग आहे.

१०. अभ्यासासाठी एकाग्रता आवश्यक आहे. एकाग्रतेसाठी ध्यान आवश्यक आहे. केवळ ध्यानाद्वारे आपण इंद्रियांवर संयम ठेवून एकाग्रता प्राप्त करू शकतो.

**निष्कर्ष :**

भारत देश महान साधू संतांची भूमी आहे. आपल्या देशात अनेक साधू संत होऊन गेलेत ज्यांनी आपले कर्तुत्व आणि आध्यात्मिक शक्तीच्या बळावर संपूर्ण जगाला मार्गदर्शन केले. अश्याच या महान संतांपैकी एक संत स्वामी विवेकानंद होते. स्वामी विवेकानंदांना जगातील महापुरुषांमधून एक मानले जाते. विवे... भारताचा गौरव संपूर्ण जगाला दाखवून दिला... जुलै १९०२ रोजी विवेकानंदाचे देहावसान झाले... विवेकानंदाना अल्पाआयुष्य लामलं, तरी त्यांच्या... ठसा विसाव्या शतकावर आणि अध्याप राहि... विश्वधर्माचा पुरस्कार करणारा, समाजाकडे... फिरवता दीनदुबळ्याच्या सेवेतून ईश्वरसेवा... समाजाच्या आध्यत्मिक उन्नतीप्रमाणेच भौतिक... महत्व प्रतिपादन करणारा व त्यासाठी सम... आगळा संन्यासी म्हणून त्याच कार्याला विशे... आहे.

"जोपर्यंत जिवंत आहात, तोपर्यंत शिकत... कारण अनुभव हा जगातील सर्वश्रेष्ठ शिक्षक...

-स्वामी वि...

## संदर्भ सूची :-


१. भगत, रा. तु. : शिक्षणातील थोर वि... चैतन्य प्रकाशन (२००५), कोल्हापूर...

२. कुलकर्णी सुहास आणि इतर : यांचे... सहस्त्रक ; रोहन प्रकाशन (२००३)...

3. https://www.marathisahitya.in/2... swami-vivekanand-quotes.html

4. https://wishmarathi.com/s... vivekananda-marathi-suvichar-...

5. https://mr.wikipedia.org/

6. https://www.thosprahar.com/s... vivekanand-jaynti-national-you... 10-important-life-